# उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी,उपविभाग पुणे यांचे कार्यालय

कार्यालयाचा पत्ता:- पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, स.नं २३, बावधन बु. ता.मुळशी जि.पुणे
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२२२३९ Email : sdomaval@gmail.com

*****************************************************************************************

**जा.क्र.भूसं/एसआर/१२/२०२५** **दिनांक :-२५/११/२०२५**

**प्रति,**

१) **मा.मुख्य अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे**
**२) तहसिलदार, मुळशी**
**३) ग्राम महसुल अधिकारी, चांदे**
**ता.मुळशी, जि. पुणे**

**विषय** :-पुणे महानगर प्रदेश विकास पाधिकरणाच्या प्रस्तावित पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यातील ठाकर वस्ती ते माण गावठाण या रस्त्याकरीता मौजे चांदे ता. मुळशी येथील ग.नं.२९८ पै व इतर पैकी व इतर ग.नं.मधील १७९६.५१ चौ.मी क्षेत्र खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने संपादन करणेबाबत.
**जाहिर नोटीस प्रसिद्ध करणेबाबत..**

**संदर्भ:-** मा.जिल्हाधिकारी, पुणे भुसंपादन (समन्वय) शाखा यांचेकडील आदेश क्र.पीएलसी सीआर/६०/२०२५ दिनांक.०७/१०/२०२५.

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यातील ठाकर वस्ती ते माण गावठाण या रस्त्याकरीता मौजे चांदे ता.मुळशी जि.पुणे येथील स.नं.२९८ पै व इतर मधील १७९६.५१ चौ.मी.क्षेत्र खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने संपादनाची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त नमूद शासन निर्णयातील परिच्छेद क्र.(२)(ब) अन्वये सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करणेसाठी परिच्छेद क्र.२(ब)(एक) नुसार जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भुसंपादनाबाबतची जाहिर नोटीस यासोबत जोडून पाठविण्यात आली असून सदरची नोटीस व हरकतीचा नमूना आपले कार्यालयाचे दर्शनी भागातील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन प्रसिद्धी अहवाल उलटटपाली या कार्यालयास सादर करावा.

**सोबत - प्रसिध्दीस द्यावयाचे जाहीर नोटीस व हरकतीचा नमूना (प्रत्येकी दोन प्रतीत)**

**(सुरेंद्र नवले)**
**उपविभागीय अधिकारी**
**मावळ-मुळशी, उपविभाग पुणे**

**नमुना - ३**

**खाजगीक्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमिन मालक किंवा हिसंबंधित व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्याबाबत जाहीर नोटीस**

---

उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी,
उपविभाग पुणे यांचेकार्यालय
पत्ता - पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधीनी
स.नं.२३, बावधन बु.ता.मुळशी जि.पुणे- ४११०२१
पुणे, दिनांक :- २५/११/२०२५

**क्रमांक - भूसंपादन/एसआर/१२/२०२५**

ज्या अर्थी, **सह आयुक्त जमीन व मालमत्ता विभाग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे** यांनी **प्रस्तावित UGC मधील पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील मौजे चांदे येथील ठाकरवस्ती ते माण गावठाण** या सार्वजनिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५, दि. २५ जानेवारी, २०१७ मधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने **मुख्य अभियंता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे** यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे;

ज्या अर्थी जिल्हाधिकारी,पुणे यांचे **आदेशक्र.पीएलसी/एसआर/६०/२०२५ दि.०७/१०/२०२५** अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तद्अनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभागाकडील परिपत्रकक्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

आणि ज्या अर्थी, उक्त जाहीर नोटीसीद्वारे संबंधीत जमिन धारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणा प्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे **मुख्य अभियंता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे** यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागविण्यात आलेली आहेत;त्या अर्थी, आता

१.मी, **श्री. सुरेंद्र नवले, उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी, उपविभाग पुणे**,जिल्हा-पुणे याद्वारे अनुसूची -एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने **मुख्य अभियंता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे** यांचे नावे खरेदीकरण्यात येणार असल्याने, या अनुसूचीमध्ये नमूद सर्व्हे नंबर/गट नंबर मधील **जमिनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत** जमिन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून**१५ दिवसाच्या आत** हरकती किंवा सूचना विहीत नमुना-४ मध्ये मागवित आहे. किंवा त्यांना माझ्यासमोर उपस्थित राहण्यास सांगत आहे.

२. हरकती किंवा सूचनांचा विहीत नमुना-४ **उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी, उपविभाग पुणे/सहआयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे** यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेचसदर नमुना या कार्यालयामार्फत/महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत **उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी, उपविभाग, पुणे** यांच्या कार्यालयामध्ये व **सह आयुक्त, जमीन व**

**मालमत्ता विभाग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**यांच्याकार्यालयामध्येकार्यालयीन वेळेत जमिन धारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणांसाठीखुली ठेवण्यात आली आहे.

४. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून **१५ दिवसाच्या आत** जमिनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत जमिन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तीकडून प्राप्त झालेल्या हरकतींची किंवा सुचनांची चौकशीकरण्यात येईल आणि संबंधित हरकत घेणाऱ्यांना त्यांच्या हरकतींच्या किंवा सूचनांच्या समर्थनार्थ तोंडी व कागदोपत्री पुरावा सादरकरण्यासाठी जातीने किंवा वकिलामार्फत किंवा कायदेशीर व्यक्तीमार्फत उपस्थित राहण्याची मुभा असेल.

५. उक्त कालावधीमध्येहरकती किंवा सूचना प्राप्त न झाल्यांस, उक्त जमिनीबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंधित नाहीत असेगृहीत धरुन, कायदेशीर शिर्षक अहवालाच्या अनुषंगाने जमिन धारकांकडून उक्त जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**अनुसूची - एक**

**खरेदीकरावयाच्या जमिनीचातपशील**

**मौजे:- चांदे तालुका - मुळशी** **जिल्हा- पुणे**

| अ.क्र. | गावाचे नाव | ग.नं / स.नं | भूधारणा पध्दती | थेटखरेदी करावयाचे क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| १ | **चांदे** | २९८ | वर्ग-१ | १७९६.५१ |
| एकुण | | | | १७९६.५१ |

ठिकाण :- पुणे

दिनांक :- २५/११/२०२५

**(सुरेंद्र नवले)**

**उपविभागीय अधिकारी**

**मावळ-मुळशी उपविभाग पुणे**

## नमुना - ४

## खाजगीक्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमिन मालक किंवा हिसंबंधित व्यक्तीकडून हरकती / सूचना

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रति,**

उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी,
उपविभाग पुणे यांचेकार्यालय
पत्ता:-पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधीनी
स.नं.२३, बावधन बु.ता.मुळशी जि.पुणे- ४११०२१

**विषय :-** खाजगीक्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत हरकती / सूचना

**महोदय,**

आपले कार्यालयाकडील जाहीर नोटीस **क्र.भूसंपादन/एसआर/१२/२०२५, दि.२५/११/२०२५** अन्वये **मौजे चांदे ता.मुळशी, जि. पुणे** येथील जमिन **प्रस्तावित UGC मधील पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील ठाकरवस्ती ते माण गावठाण रस्ता** या प्रयोजनासाठीअनुसूची - एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेटखरेदी पध्दतीने **मुख्य अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे** यांचे नावे खरेदी करण्यात येणार असल्याने, या अनुसूचीमध्ये नमूद सर्व्हे / गट नंबरमधील **जमिनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत** जमिन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या **दिनांकापासून १५ दिवसाच्या आत** हरकती किंवा सूचना मागविण्यात आल्या आहेत.

२. मी / आम्ही, श्री./श्रीमती ---------------------------------------------------------------------- पत्ता-------------------------------------------------------------------------------------------------------, याद्वारे, अनुसूची - एक मधील जमिनीच्या मालकी हक्कांबाबत व न्यायालयीन दाव्यांबाबत माझ्या / आमच्या हरकती किंवा सूचनासादरकरीत आहे / आहोत.

### अनुसूची - एक
### खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील
### मौजे चांदे तालुका -मुळशी, जिल्हा- पुणे

| अ.क्र. | भूमापन / गटक्रमांक | क्षेत्र (हे.आर) | जमिनीचा प्रकार * | जमिनीचा वर्ग** | जमिन मालकाचे किंवा हितसंबधित व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |

* जमिनीचा प्रकार :- १. जिरायत २. बागायत ३. अकृषक
** जमिनीचावर्ग :- १. भोगवटादार वर्ग - एक २. भोगवटादार वर्ग - दोन ३. सरकारी पट्टेदार
४. इतर (महसूल अभिलेखानुसार वर्ग नमूद करावा.)

३. मी / आम्ही, याद्वारे, माझ्या / आमच्या हरकती किंवा सूचनाकागदत्रांसह पुढीलप्रमाणेसादरकरीत आहे / आहोत.

**(अ) हरकती :-**

**(ब) सूचना :-**

ठिकाण :- पुणे

आपला विश्वासू,

दिनांक :- / /

**जमिन मालकाचे / हितसंबंधित व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी**